# कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
## (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा प्रादेशिक घटक)
## गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई - ४०००५१.
**ई-मेल : konkanmhada2008@gmail.com दुरध्वनी क्र. ०२२-६६४०५०१७**

प्रधानमंत्री आवास योजनाअंतर्गत (PMAY) मंजुर घरांचे रजिस्ट्रेशन पूर्ण करण्याकरीता कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा घटक) विभागामार्फत शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील (CLTC) तज्ञांची एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ ११ महिन्यांच्या नियुक्तीकरीता दि. १४/०२/२०२५ ते दि.२१/०२/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत रुम नं. १६८, पोट मजला, गृहनिर्माण विभाग, वांद्रे (पू), मुंबई- ४०००५१ येथे अर्ज मागविण्यात येत आहेत. (सुट्टीचे दिवस वगळून १५/०२/२०२५, १६/०२/२०२५ व १९/०२/२०२५)

तरी सर्व इच्छुक पात्र उमेदवारांनी https://www.mhada.gov.in या संकेतस्थळावर Quick Links या टॅबमध्ये सादर केलेल्या माहितीपुस्तिकेनुसार आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, अनुभव व इतर कागदपत्रांसह रुम नं. १६८, पोट मजला, गृहनिर्माण विभाग, वांद्रे (पू), मुंबई- ४०००५१ या कार्यालयात अर्ज सादर करावा व सदर अर्जाच्या छाननीनंतर पात्र उमेदवारांनाच ई-मेलद्वारे प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद | शैक्षणिक अनुभवविषयक अर्हता | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | स्थापत्य अभियंता (Civil Engineer or PPP Specialist) | 02 | • Post graduate/graduate/diploma in Civil Engineering<br>• ३-५ yrs. professional experience in developing and managing projects on PPP mode.<br>• Experience in formulation of PPP projects (including relevant concession agreements, due diligence processes, value for money audits, public sector comparator, etc.)<br>• Experience in preparing project agreements, tender process, detailed legal and contractual agreements, risk management and contingent liability issues, and financial analysis of complex project proposals with respect to PPP projects. | • ७०,०००/- for Post Graduate degree holder<br>• ५०,०००/- for Bachelors degree holder<br>• ४०,०००/- for Diploma holder<br><br>(as per guidelines of PMAY under section establishment of CLTC) |
| २ | माहिती व्यवस्थापन प्रणाली तज्ञ (MIS Specialist) | 02 | • Post graduate/graduate/diploma in Computer Science/Electronics or MCA/PGDCA. / similar qualification.<br>• ३-५ years of work experience in government/semi govt. / autonomous organizations/private company of repute.<br>• Experience in software development and database management.<br>• Fluency in local language essential. | |

टीप :- वरील अ.क्र.१ व २ पदांकरीता शैक्षणिक पात्रता व आवश्यक अनुभव असणारा उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदवीधर व सर्वोच्च अनुभवधारक उमेदवार यांची शिफारस करण्यात येऊन मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

सही /-
(रेवती गायकर)
मुख्य अधिकारी
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

Mahabharti.in

# माहितीपुस्तिका

**१. पदाचे नाव, पद संख्या, शैक्षणिक अर्हता व मानधन :-**

| अ.क्र. | पदाचे नाव कंत्राटी पध्दतीने | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१. | स्थापत्य अभियंता (Civil Engineer or PPP Specialist) | 02 | i. Post graduate/graduate/diploma in Civil Engineering<br>ii. ३-५ yrs. professional experience in developing and managing projects on PPP mode.<br>iii. Experience in formulation of PPP projects (including relevant concession agreements, due diligence processes, value for money audits, public sector comparator, etc.)<br>iv. Experience in preparing project agreements, tender process, detailed legal and contractual agreements, risk management and contingent liability issues, and financial analysis of complex project proposals with respect to PPP projects. | • ७०,०००/- for Post Graduate degree holder<br>• ५०,०००/- for Bachelors degree holder<br>• ४०,०००/- for Diploma holder<br>(as per guidelines of PMAY under section establishment of CLTC) |
| ०२. | माहिती व्यवस्थापन प्रणाली तज्ञ (MIS Specialist) | 02 | i. Post graduate/graduate/diploma in Computer Science/Electronics or MCA/PGDCA. / similar qualification.<br>ii. ३-५ years of work experience in government/semi govt. / autonomous organizations/private company of repute.<br>iii. Experience in software development and database management.<br>iv. Fluency in local language essential. | • ७०,०००/- for Post Graduate degree holder<br>• ५०,०००/- for Bachelors degree holder<br>• ४०,०००/- for Diploma holder<br>(as per guidelines of PMAY under section establishment of CLTC) |

**२. कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई नूसार भरावयाची पदे :-**

| क्षेत्राचे नाव | भरावयाचे पदे स्थापत्य अभियंता | भरावयाचे पदे माहिती व्यवस्थापन प्रणाली तज्ञ (MIS Specialist) | भरावयाचे एकूण पदे |
|---|---|---|---|
| कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई | २ | २ | ४ |

**३. कंत्राटी पदाच्या अटी /शर्ती खालीलप्रमाणे राहतील.**

a) उमेदवाराने A-४ साईजच्या पांढऱ्या कागदावर सोबत दिलेल्या विहीत नमून्यातील अर्ज सादर करावा. अर्ज स्वत:च्या अक्षरात भरलेला व वाचनीय असावा.

b) उमेदवाराने अर्जावर अलीकडच्या काळातील एक पासपोर्ट साईज फोटो चिटकावून फोटोवर उमेदवारांनी स्वत:ची स्वाक्षरी करावी.

c) उमेदवारास मुलाखती करिता स्वखर्चाने यावे लागेल व त्याबाबतीत कोणत्याही प्रकारचा मोबदला या कार्यालयाकडून देण्यात येणार नाही.

d) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्र सादर केल्याचे /दिशाभूल केल्याचे अथवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

Mahabharti.in

e) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र /अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

f) निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न दर्शविता स्थगित/रद्द अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार याबाबत स्थापन केलेल्या निवड समितीने राखून ठेवले आहेत.

g) उमेदवारांनी निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निवडी संबंधित कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

h) **शैक्षणिक अर्हता** : उमेदवाराने अर्जासोबत वयाचा दाखला म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा माध्यमिक शालांत (SSC) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. तसेच शैक्षणिक अर्हतांचे मूळ कागदपत्रे (सर्व वर्षाच्या गुणपत्रिका) व पदवी/पदव्युत्तर प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र व मुलाखतीच्या अनुषंगाने इतर आवश्यक मुळ कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रतिचा एक संच इत्यादी आपल्या अर्जासोबत जोडावा व मुलाखतीस मूळ कागदपत्रांसह हजर रहावे.

i) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याचे सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याचे अधिवास प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहिल.

j) सदरची पदे तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे त्यांना नियमित आस्थापनेवरील पदाप्रमाणे असणारे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच तात्पुरत्या स्वरुपाची पदस्थापना असल्याने कालावधी कमी वा अधिक करण्याचे सर्वस्वी अधिकार म्हाडास राहतील.

k) शासकीय/निमशासकीय सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयाच्या परवानगीने अर्ज सादर करणे आवश्यक राहिल. तसेच अर्जासमवेत सदर परवानगीची प्रत जोडणे आवश्यक राहिल.

l) निवड झालेल्या उमेदवाराने रूजू होण्यापूर्वी रु.१००/- च्या शपथपत्रावर विहीत नमून्यातील करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल, यानंतरच नियुOEतीचे आदेश देण्यात येतील.

m) कंत्राटी पदावर निवड झालेल्या उमेदवारास जिल्ह्यातील कोणत्याही जिल्ह्यात नियुOEत करण्यात येईल.

n) कंत्राटी पदावर निवड झालेल्या उमेदवाराने ०३ दिवसाच्या आत नियुOEत केलेल्या ठिकाणी रुजू व्हावे लागेल. विहीत मुदतीत रूजू न झालेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येऊन करार रद्द समजण्यात येईल.

o) निवड प्रक्रिये संदर्भात उमेदवारांशी करण्यात येणारा संपूर्ण पत्रव्यवहार आणि सूचना या उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडी वरच कळविण्यात येतील. यामुळे उमेदवारांनी मोबाईल क्र. व ई-मेल आयडी अर्जात काळजीपूर्वक व अचूक नमूद करण्याबाबत विशेष दक्षता घ्यावी.

## ४. अर्ज करण्याची पध्दत :-

a) उमेदवाराने बंद लिफाफ्यामध्ये कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ येथे स्वत: अथवा प्रतिनिधीमार्फत अर्ज सादर करावा व त्याची पोच घ्यावी.

b) विहीत मुदतीत व नमूद A प्रमाणे सादर केलेले अर्ज स्विकारले जातील.

Mahabharti.in

c) पोस्टाने व ई-मेलने केलेले अर्ज स्विकारले जातील.

d) लिफाफ्यावर प्रति व प्रेषक खालीलप्रमाणे लिहीने बंधनकारक राहिल.

| **लिफाफ्याची पहिली बाजू** | **लिफाफ्याची दुसरी बाजू** |
|---|---|
| पदाचे नाव ...................<br>प्रति,<br>मुख्य अधिकारी,<br>कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,<br>गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई - ४०००५१ | प्रेषक श्री/श्रीमती .............................................<br>सद्याचा संपूर्ण पत्ता .............................................<br>.........................................................................<br>मोबाईल<br>क्र........................................................<br>ई-मेल<br>आयडी..................................................... |

**५. अर्जासोबत जोडावयाचे आवश्यक कागदपत्रे:**

a) उमेदवाराने अर्जासोबत वयाचा दाखला म्हणून शाळा सोडल्याचा दाखला / शालांत परिक्षा प्रमाणपत्र.
b) आधारकार्डची छायांकीत प्रत.
c) शैक्षणिक अर्हताचे छायांकीत प्रत.
d) अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र व मुलाखतीच्या अनुषंगाने इतर आवश्यक मुळ कागदपत्रांच्या स्वसाक्षांकीत प्रती.
e) इतर आवश्यक कागदपत्रे.

**६. अर्ज करण्याचे ठिकाण :**

रुम नं. १६८, पोट मजला, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ‐ ४०००५१ ई-मेल - konkanmhada2008@gmail.com

**७. अर्ज करण्याचे दिनांक व वेळ :**

दि. १४/०२/२०२५ पासून ते २१/०२/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. (सुटटीचे दिवस वगळून दि. १५.०२.२०२५, १६.०२.२०२५ व १९.०२.२०२५)

**Roles & Responsibilities :-**

**A) Civil Engineer :-**

i. Support to ULB to develop city/ULB level PPP plan of action.
ii. Appraise project activities for carrying out of PPP Projects.
iii. Review and analyse the projects from PPP perspective.
iv. Assist in preparing the pre-feasibility reports for the ULBs. 18
v. Inspect, visit and review any PPP project under implementation in the cities.
vi. Awareness Building & Training for relevant State Government Officials on PPP projects.
vii. Any other related activities as decided by head of city level technical cell

**B) MIS Specialist:**

i. Coordinate the data entry and file uploads into systems to be used by Urban Local Body (ULBs) on a regular basis.
ii. Prepare detailed formats and ensuring the data entry in the desired MIS application.
iii. Set up systems for measuring and monitoring and reporting progress of the projects.
iv. Prepare quarterly progress report and submit the same to SLNA through ULB.
v. Any other related tasks that may be entrusted upon by the head of CLTC

**विशेष सुचना :-**

**निवड प्रक्रिये संदर्भात उमेदवारांशी करण्यात येणारा संपूर्ण पत्रव्यवहार आणि सूचना या उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडीवरच कळविण्यात येतील. यामुळे उमेदवारांनी मोबाईल क्र. व ई-मेल आयडी अर्जात काळजीपूर्वक व अचूक नमूद करण्याबाबत विशेष दक्षता घ्यावी.**

# अर्जाचा नमूना

प्रति,

**मुख्य अधिकारी,**
रुम नं. १६८, पोट मजला,
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, कलानगर,
वांदे (पूर्व), मुंबई - ४०००५१

विषय :- ------------------------------------- या पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने मी श्री/श्रीमती ....................................................... या पदासाठी ईच्छुक असून, आपण दिलेल्या अटी/शर्ती मला मान्य असून मी उपरोक्त कंत्राटी पदासाठी अर्ज सादर करीत आहे. सदरची पदे तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे मला नियमित आस्थापनेवरील पदाप्रमाणे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाही, हे मला मान्य आहे.

**१) उमेदवाराचे संपूर्ण नाव :-**

**२) पत्र व्यवहाराचा सध्याचा संपूर्ण पत्ता :-**

**३) पत्र व्यवहाराचा कायमचा पत्ता :-**

**४) मोबाईल क्रमांक :-**

**५) ई-मेल आयडी :-**

**६) जन्म तारीख :- --------/--------/--------**
**(दिवस/महिना/वर्षे)**

**७) जात :- प्रवर्ग :-**

**८) राष्ट्रीयत्व :-**

**९) महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणापत्र जोडले आहे काय? ............................. (होय/नाही).**

**१०) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील :-**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | बोर्ड/मंडळ/ विद्यापीठाचे नाव | एकूण गुण | प्राप्त गुण | टकेवारी % | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |